**<u>निशाणी क्र. ५ वरील आदेश</u>**

वादीने प्रतिवादी क्र. १ विरुध्द प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ सह कलम १५१ अन्वये तुर्तातुर्त मनाईसाठी दाखल केला आहे.

२. गाव मौजे हडपीड, तालुका – देवगड, जिल्हा – सिंधुदूर्ग येथील खालील वर्णनाच्या मिळकती :

| अ.क्र. | सर्व्हे क्र. | हि.नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | ७० | १५ | ०—०८.०<br>०—०१.६ |
| २ | १०० | १० | ०—०१.० |
| ३ | ८८ | ३३ | ०—१२.०<br>०—०२.० |
| ४ | ९० | २४ | ०—३०.०<br>०—०६.० |
| ५ | ८७ | २४ | ०—१४.०<br>०—११.० |
| ६ | ८७ | ३२ | ०—२०.०<br>०—०४.० |
| ७ | ८० | ३ | ०—०४.०<br>०—०१.० |
| ८ | ८३ | २७ | ०—०२.०<br>०—०१.० |
| ९ | ८४ | २२ | ०—०८.०<br>०—०४.० |
| १० | १११ | ४७अ | ०—०१.० |
| ११ | ७० | १४ | ०—०१.०<br>०—०१.० |
| १२ | ७१ | ७ | ०—०८.०<br>०—०३.० |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | ५५ | १६ | ०—३०.०<br>०—०५.० |

वरील मिळकतीमधील सागवान, आंबा, फणस व इतर जंगली झाडझडो—यासह मिळकती. ( सदर मिळकती यापुढे दावा मिळकती म्हणून नमूद केल्या आहेत.) दावा मिळकती वादी प्रतिवादी क्र. १ ते ११ यांच्या आईच्या वडीलांपासून वारसा हक्काने चालत आलेल्या सामाईक वहिवाटीच्या मिळकती आहेत. वादी प्रतिवादींची आजी गिरीजाबाई शंकर राणे हिला तिच्या पतीपासून वारसा हक्काने दावा मिळकती मिळालेल्या आहेत. गिरीजाबाई हिला लिलावती व सुलोचना अशा दोन मुली होत्या. लिलावती ही दिनांक २७/७/१९८० इ. रोजी मयत झाली तर गिरीजाबाई ही ११/०७/१९८२ इ. रोजी मयत झाली. त्यामुळे गिरीजाबाई हिचा वारस तपास होवून वारस रजिष्टर क्र. ७२ अन्वये लिलावतीच्या सर्व मुलांची नावे व सुलोचना हिचे नाव गिरिजाबाईचे वारस म्हणून फेरफार क्र. १३०६ ला नोंद झाले. त्यानंतर सुलोचना ही दिनांक २०/७/१९९५ इ. रोजी मयत झाली. प्रतिवादी क्र. ६ ते ११ हे सुलोचना हिचे वारस आहेत, तर वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ हे लिलावतीचे वारस आहेत. दावा मिळकतींचे अदयाप वाटप झाले नाही. मार्च २०१६ मध्ये प्रतिवादी क्र. १ याने वादी प्रतिवादींच्या अपरोक्ष दावा मिळकतीमधील मौल्यवान ४५ सागवान जातीची व इतर मोठी १५ झाडे अशी एकूण ६० झाडे बेकायदेशीररित्या तोडून ठेवली आहेत. वादीने वन खात्याकडे रितसर तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ याला तोडलेल्या झाडांचा वाहतूक परवाना मिळाला नाही. वादीने प्रतिवादी क्र. १ यास सदर झाडे का तोडली असे विचारले असता त्याने दावा मिळकती त्याच्या एकटयाच्या आहेत, वादीचा या मिळकतीमध्ये काही संबंध नाही असे सांगितले. वादीने दावा मिळकतींचे अधिकार अभिलेख काढून पाहिले असता, प्रतिवादी क्र. १ याने बेकायदेशीर नोंदीच्या आधारे दावा मिळकतींना त्याचे एकटयाचे नाव नोंद केल्याचे दिसून आले. अशा बेकायदेशीर नोंदीच्या आधारे

प्रतिवादी क्र. १ हा दावा मिळकतींचा एकटा वारस होवू शकत नाही. प्रस्तुत वादीने प्रतिवादी क्र. १ यास सदरची तोडलेली झाडे वाहतूक करु नये, तबदिल करु नये अगर विक्री करु नये अशी नोटीस पाठविली. तरी देखील तो दावा मिळकतीमधील झाडे विक्री करणार असल्याचे बोलत आहे. त्यामुळे दावा मिळकतीमधील वादीच्या हिश्श्याप्रमाणे वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी व प्रतिवादी क्र. १ ने तोडलेली झाडे वाहतूक, विक्री करु नये यासाठी वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. दरम्यान दाव्याच्या अंतिम निकालापावेतो प्रतिवादी क्र. १ याने दावा मिळकतीमधील तोडलेली झाडे वाहतूक करु नये, विक्री करु नये, इतर कोणतीही झाडे तोडू नयेत, दावा मिळकती कोणासही तबदिल करु नये, दावा मिळकतीमध्ये ति—हाईत इसमाचा हक्क प्रस्थापित करु नये यासाठी वादीने प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ याने निशाण क्र. ५५ ला म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. १ चे आजोबा म्हणजेच आईचे वडील शंकर मुकूंद राणे मयत झाल्यानंतर आजीचा सांभाळ प्रतिवादी क्र. १ करत होते. तिला अन्न, वस्त्र यासाठी लागणारे पैसे प्रतिवादी क्र. १ देत होता. सन १९६७ ते १९८२ पर्यत प्रतिवादी क्र. १ हा त्याच्या आजीला धनप्रेष ने खर्चासाठी पैसे पाठवत होता. आणखीन पैसे लागल्यास प्रतिवादी क्र. १ हाच पैसे देत होता. तिचे आजारपण व औषधपाणी प्रतिवादी क्र. १ हाच पाहत होता. तिच्या पालनपोषणाची सर्व जबाबदारी प्रतिवादी क्र. १ नेच पार पाडली आहे. त्यामुळे दिनांक १८/१२/१९७२ इ. रोजी आजी गिरीजाबाई शंकर राणे हिने दुय्यम निबंध देवगड यांच्यासमोर विनामोबदला बक्षिसपत्राने तिच्या नावच्या मिळकती प्रतिवादी क्र. १ याला दिल्या आहेत. त्यानंतर दिनांक ११/७/१९८२ इ. रोजी गिरीजाबाई मयत झाल्यानंतर तिचा मरणोत्तर विधी व त्यासाठी लागणारा सर्व खर्च प्रतिवादी क्र. १ यानेच केला आहे. त्यानंतर दिनांक २३/११/१९७४ इ. रोजी फेरफार क्र. ११०२ अन्वये सदर विनामोबदला बक्षिस पत्राच्या आधारे प्रतिवादी क्र. १ याचे

नाव नोंद झाले. सदर फेरफार नोंदी विरुध्द वादी अगर अन्य कुणीही अपिल केले नाही अगर हरकत घेतली नाही. अशा प्रकारे दाव्यातील मिळकतींसह गिरीजाबाई हिच्या अन्य मिळकती प्रतिवादी क्र. १ यास बक्षिसपत्राने मिळालेल्या आहेत व प्रतिवादी क्र. १ हाच या मिळकतींचा मालक झाला आहे. सन १९७२ पासून या संपूर्ण मिळकतींमध्ये प्रतिवादी क्र. १ हाच वहिवाट करत आहे. सदर मिळकतींमध्ये प्रस्तुत प्रतिवादीची कब्जे वहिवाट असल्याचे वादी व इतर प्रतिवादींना पूर्णपणे माहित होते व आहे. सदर मिळकतींकडे प्रतिवादी क्र. १ व्यतिरिक्त वादी अगर इतर प्रतिवादींचा काहीही संबंध नाही. मात्र प्रतिवादी क्र. ६ ते ११ ची आई सुलोचना हिने बेकायदेशीरपणे दावा मिळकतींना तिचे नाव लावून घेतले आहे. या पोकळ नोंदीच्या आधारे प्रतिवादी क्र. ६ ते ११ यांना दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्कसंबंध प्राप्त होत नाही. दावा मिळकतींच्या उता—यांमध्ये पिकपाहणी सदरी प्रतिवादी क्र. १ याचेच नाव नोंद आहे. यावरुन दावा मिळकतींमध्ये प्रतिवादी क्र. १ चीच कब्जे वहिवाट आहे हे स्पष्ट होते. दावा मिळकतीमधील झाडे प्रतिवादी क्र. १ याने स्वखर्चाने लावून जोपासली आहेत. दावा मिळकतीपैकी सर्व्हे क्र. ९० हि.क्र. २४ या मिळकतीमधील ४५ झाडे तोडण्याकरीता प्रतिवादी क्र. १ याने दिनांक २७/१/२०१६ इ. रोजी वनअधिकारी यांच्याकडे परवानगीचा अर्ज दिला होता. सदरचा अर्ज दिनांक ५/२/२०१६ इ. रोजी मंजूर झाला आहे. त्यामुळे वन अधिकारी यांच्या परवानगीनेच व त्यांनी दिलेल्या शर्तीचे पालन करुनच प्रतिवादी क्र. १ ने सदरची झाडे तोडली आहेत याबाबत तक्रार करण्याचा वादीला अधिकार नाही. सबब, या सर्व कारणास्तव प्रस्तुत प्रतिवादीने हा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. वादी तर्फे विद्वान विधिज्ञांचा व प्रतिवादी क्र. १ चा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी क्र. १ याने निशाण क्र. ७० ला लेखी निवेदन सादर केले आहे.

५. वादी व प्रस्तुत प्रतिवादीने केलेली कथने, सादर करण्यात आलेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन माझे विचारार्थ खालील वादमुद्दे निष्पन्न झाले. त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचे वतीने सकृतदर्शनी प्रकरण आहे का ? | होकारार्थी |
| २ | सोयीचा समतोल वादीच्या वतीने आहे का ? | होकारार्थी |
| ३ | प्रस्तुत अर्ज नामंजूर झालेस वादीचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे का ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

६. वादीने त्याचे अर्जाचे पुष्ठयर्थ निशाण क्र. ६ ते १८ ला दावा मिळकतींचे ७/१२ उतारे, निशाण क्र. ४ च्या यादीसोबत वनविभागाकडे केलेल्या तक्रारी अर्जाची स्थळप्रत, प्रतिवादी क्र. १ ला पाठविलेल्या नोटीशीची स्थळप्रत, नोटीस पोच झाल्याची पोच पावती, निशाण क्र. ६१ च्या यादीसोबत कुलमुखत्यार पत्र, फेरफार उतारे, निशाण क्र. ६७ व ७४ च्या यादीसोबत फेरफार क्र. १३०६ ची मेळाची फाईल, तक्रार रजिस्टर क्र. २ चा उतारा, वारस रजिष्टरचा उतारा, इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

७. प्रतिवादी क्र. १ याने त्याचे म्हणण्याचे पुष्ठयर्थ निशाण क्र. ५९ च्या यादीसोबत दिनांक १८/१२/१९७२ इ. रोजीचे बक्षीसपत्र, दस्त क्र. ९९/१९७२ ची पावती, वृक्ष अधिकारी कणकवली यांचा आदेश, निशाण क्र. ७१ व ७२ सोबत धनप्रेष पावत्या, फेरफार क्र. ११०२ बाबतची तलाठी यांनी प्रसिध्द केलेली सुचना, इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

## <u>मुद्दा क्र. १ करीता</u>

८. वादी याने दाव्यामध्ये दावा मिळकती या मयत गिरिजाबाई हिच्याकडे तिच्या पतीपासून मिळालेल्या आहेत असे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. १ याने सदर मिळकती मयत गिरीजाबाई हिच्या स्वतंत्र अगर स्वसंपादीत मिळकती आहेत असे मुळीच कथन केले नाही. दिनांक १८/१२/१९७२ इ. रोजीच्या बक्षिसपत्रामध्ये सदर मिळकतीबाबत अदयाप वाटप व्हावयाचे आहे असे नमूद केले आहे असे दिसून येते. यावरुन सदर मिळकती या गिरिजाबाई हिच्या स्वतंत्र अगर स्वसंपादीत मिळकती नसून त्या मिळकती तिच्या सासरच्या मिळकती आहेत हे स्पष्टपणे दिसून येते. निशाण क्र. ६७ सोबत फेरफार क्र. १३०६ बाबत वादग्रस्त नोंदवही प्रकरण दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणामध्ये मयत गिरिजाबाई हिचे पुतणे तुकाराम शिवराम राणे व गंगाराम शिवराम राणे यांनी गिरिजाबाई मयत झाल्यानंतर त्यांची भाऊ हिश्श्यापैकी गिरिजाबाई हिचे नावे असलेल्या खाते क्रमांक ५२ च्या मिळकतींना त्यांची नावे वारसा हक्काने नोंद व्हावी याबाबत मंडल अधिकारी यांच्याकडे अर्ज दिल्याचे दिसून येते. यावरुन देखील गिरिजाबाई हिच्या नावे असलेल्या मिळकती या तिच्या स्वतंत्र अगर स्वसंपादीत मिळकती नसून तिच्या सासरच्या मिळकती आहेत हे स्पष्ट होते. परिणामी सदर दावा मिळकती या गिरिजाबाई हिच्या सासरच्या व तिच्या मयत पतीच्या मिळकती होत्या हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

गिरिजाबाई ही सन १९८२ साली मयत झाली याबाबत वाद नाही. गिरिजाबाई मयत झाली तेव्हा तिची मुलगी लिलावतीचे सर्व वारस व सुलोचना असे सर्वजण गिरिजाबाई हिला वारस होते असे निशाण क्र. ६७ व ७४ सोबत दाखल केलेल्या गिरिजाबाई हिच्या वारस प्रकरणाची नोंदवहीच्या उता—यावरुन दिसून येते. ज्या दिवशी गिरिजाबाई हिने तथाकथित बक्षिसपत्र बनविले त्या दिवशी गिरीजाबाई हिचे सदर वारस हयात होते. त्यामुळे त्या

दिवशी सदर मिळकती तिच्या एकटीच्या स्वतंत्र व स्वसंपादीत मिळकती होत्या असे मुळीच म्हणता येणार नाही. किंबहूना सदर मिळकती या गिरिजाबाई हिच्या मुली सुलोचना व लिलावती यांच्या वडीलोपार्जित मिळकती होत्या असे मला वाटते. त्यामुळे अशा सर्व वडीलोपार्जित मिळकतीबाबत कोणाही एका सदस्याला बक्षीसपत्र करुन देता येईल का हे पाहणे आवश्यक वाटते. मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी **शिवाप्पा मल्लाप्पा इसापुरे व इतर वि. गणपत मल्लाप्पा इसापुरे व इतर, २०१० (२) बॉम्बे.सी.आर. ६७२** या न्यायनिवाडयामध्ये हिंदू सहदायाद याला त्याच्या अविभक्त हिश्श्याबाबत बक्षिसपत्र करुन देण्याचा मुळीच अधिकार नाही, हिंदू सहदायाद याला त्याच्या स्वतंत्र व स्वसंपादीत मिळकतीबाबत बक्षिसपत्र करुन देण्याचा अधिकार आहे, मात्र त्याला त्याच्या अविभक्त हिश्श्याचे देखील बक्षिसपत्र करण्याचा अधिकार नाही असे स्पष्ट केले आहे. प्रतिवादी क्र. १ च्या म्हणण्यानुसार गिरिजाबाई हिने सर्व दावा मिळकतींचे बक्षिसपत्र त्याचे नावे केले आहे. मात्र वरील कायदेशीर तत्वानुसार गिरिजाबाई हिला या दावा मिळकतींचे बक्षिसपत्र मुळीच करता येणार नाही किंबहूना त्यामधील तिच्या हिश्श्याचे देखील बक्षिसपत्र करता येणार नाही. त्यामुळे सदरचे बक्षिसपत्र कायदेशीर आहे असे प्रथमदर्शनी वाटत नाही.

मा. केरळ उच्च न्यायालय यांनी **केसवा कुरुप राघवा कुरुप वि. थॉमस इडिकुला आणि इतर, ए.आय.आर. १९६९ केरळ २१** या न्यायनिवाडयामध्ये बक्षिस घेणा—या व्यक्तीने संबंधीत मिळकती बक्षिस देणार याच्या हयातीत स्विकारणे अनिवार्य आहे, बक्षिस देणार याच्या मृत्यूनंतर सदर बक्षिसपत्र प्रसिध्द करणे किंवा बक्षिस देणार याच्या मृत्यूनंतर त्यामधील मिळकतींचा कब्जा दाखविला असल्यास सदरचा कब्जा हा बक्षिस देणा—या व्यक्तीच्या मयत होण्यापुर्वीचा आहे हे शाबीत होणे आवश्यक आहे असे स्पष्ट केले आहे. प्रस्तुत प्रकरणी गिरीजाबई हयात असेपर्यंत म्हणजेच सन १९८२ पर्यंत प्रतिवदी क्र. १ याने सदर बक्षिसपत्र स्विकारले अगर सदर बक्षिसपत्रामधील मिळकतींचा ताबा त्याच्याकडे आला असे दर्शविणारा कोणताही

कागदोपत्री पुरावा दिसून येत नाही. दावा मिळकतींच्या कब्जे वहिवाट सदरी प्रतिवादी क्र. १ याचे नाव नोंद आहे. मात्र सदरची नोंद सन १९८२ पूर्वीची नाही. तसेच गिरिजाबाई मयत होईपर्यंत म्हणजेच सन १९७२ ते सन १९८२ या दरम्यान दावा मिळकती त्याच्या कब्जे वहिवाटीस होत्या असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दिसून येत नाही. तथाकथित बक्षिसपत्रावर बक्षिसपत्र स्विकारणार म्हणून प्रतिवादी क्र. १ ची सही मुळीच दिसून येत नाही. यावरुन सन १९८२ पर्यंत म्हणजेच गिरिजाबाई हयात असेपर्यंत प्रतिवादी क्र. १ ने सदर बक्षिसपत्र स्विकारले किंवा या बक्षिसपत्राच्या आधारे त्याने दावा मिळकतींचा कब्जा घेतला असा कोणताही कागदोपत्री पुरावा दिसून येत नाही.

तथाकथित बक्षिसपत्रामध्ये **‘ सदर मिळकतीबाबत वाटपाचे कामकाज चालू आहे, सदर मिळकतीच्या सहहिस्सेदारांच्या तक्रारीमुळे ताब्याचे कामकाज स्थगित आहे, यापुढे होणा—या वाटपाच्या ताब्याअन्वये जी मिळकत तिला दिली जाईल तेवढीच मिळकत तुम्हास मिळावयाची आहे, वाटपाच्या ताब्यात आदलाबदल झाल्यास ताब्याप्रमाणे ताब्यात मिळालेली मिळकत ती माझ्यासाठी ताब्यात घेवून तू आपले नाव दाखल करुन घ्यावे ’** असा मजकूर लिहिण्यात आला आहे. या मजकूरावरुन सदर मिळकतीबाबत वाटपाचे प्रकरण त्यावेळी चालू होते व त्या वाटपाच्या कामी प्रत्यक्ष ताबा देण्याचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर गिरिजाबाई हिच्या ताब्यात दिलेल्या मिळकती प्रतिवादी क्र. १ ने ताब्यात घ्यावयाचा असा मजकूर असल्याचे स्पष्ट होते. यावरुन सदर मिळकतीचा ताबा या बक्षिपत्रादिवशी प्रतिवादी क्र. १ याला देण्यात आला होता असे मुळीच दिसून येत नाही. त्यानंतर देखील या मिळकतींचे वाटप झाले होते, वाटपाच्या कामी गिरिजाबाई हिला या मिळकती ताब्यात देण्यात आल्या व तिच्या ताब्यात दिलेल्या मिळकती प्रतिवादी क्र. १ च्या ताब्यात देण्यात आल्या असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दिसून येत नाही.

प्रस्तुत कामी गिरिजाबाई हयात असेपर्यंत या बक्षिसपत्राच्याआधारे प्रतिवादी क्र. १ याचे नाव दावा मिळकतींच्या अधिकार अभिलेखात नोंद झालेबाबतचा कसलाही फेरफार उतारा याकामी दाखल करण्यात आला नाही. प्रतिवादी क्र. १ याने निशाण क्र. ७१ च ७२ सोबत फेरफार क्र. ११०२ ची प्रसिध्द केलेली सुचना याकामी दाखल केली आहे. तलाठी यांनी गिरिजाबाई हिच्या बक्षिसपत्राच्याआधारे प्रतिवादी क्र. १ याचे नाव दावा मिळकतींच्या उता—याला नोंद होण्यासाठी फेरफार क्र. ११०२ बनविला होता त्याबाबत कोणाच्या हरकती असल्यास अशा हरकती मागविण्यासाठी सदरची नोटीस महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम कलम १५० (२) अन्वये दिनांक १२/१/१९७५ इ. रोजी प्रसिध्द केली होती. मात्र त्यानंतर सदर फेरफाराची नोंद मंडल अधिकारी यांनी मंजूर केली असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी सादर करण्यात आला नाही. प्रतिवादी क्र. १ याने त्याच्या म्हणण्यामध्ये सदर बक्षिसपत्राआधारे फेरफार क्र. ११०२ अन्वये दिनांक २३/११/१९७४ इ. रोजी त्याच्या नावाची नोंद झाली असे कथन केले आहे. मात्र फेरफार क्र. ११०२ अन्वये दिनांक २३/११/१९७४ इ. रोजी त्याच्या नावाची नोंद झालेला असा फेरफार उतारा त्याने याकामी दाखल केला नाही. त्यामुळे या बक्षिसपत्राची उघडपणे जाणीव अगर माहिती गिरिजाबाई हयात असेपर्यंत कोणालाही नव्हती हे स्पष्ट होते. त्यामुळे मा. केरळ उच्च न्यायालय यांच्या वर नमूद **केसवा कुरुप** या न्यायनिवाडयानुसार गिरिजाबाई हयात असेपावेतो सदर मिळकतींचा ताबा प्रतिवादी क्र. १ याला मिळाला असल्याचे दिसून येत नसल्यामुळे व असे बक्षिसपत्र झाल्याचे किंवा या बक्षिसपत्राच्या आधारे प्रतिवादी क्र. १ च्या नावाची नोंद झाल्याचे दिसून येत नसल्यामुळे हे बक्षिसपत्र कायदेशीर आहे असे मला प्रथमदर्शनी वाटत नाही.

सबब, वरील सर्व कारणास्तव दावा मिळकती या प्रतिवादी क्र. १ याच्या स्वतंत्रपणे मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत व या मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादींचा मुळीच संबंध नाही असे मला प्रथमदर्शनी वाटत नाही.

किंबहूना दावा मिळकतीमध्ये वादी व इतर प्रतिवादी यांचा हक्क व अधिकार आहे असे मला प्रथमदर्शनी वाटते. सबब, या कारणास्तव वादी यास प्रस्तुतचे प्रकरण सकृतदर्शनी आहे असे मला वाटते. सबब, मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

## <u>मुद्दे क्र. २ व ३ करीता</u>

३०. दावा मिळकतीमध्ये वादी याचा हक्क व अधिकार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. याउलट प्रतिवादी क्र. १ याच्या नावे असलेले बक्षिसपत्र कायदेशीर आहे असे प्रथमदर्शनी वाटत नाही. त्यामुळे सोईचा समतोल वादीच्या बाजूने आहे असे मला वाटते. तथाकथित झाडे ही दावा मिळकतीमधील आहेत याबाबत वाद नाही. सदरची झाडे ही दावा मिळकतीमध्ये समाविष्ठ आहेत अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ याने तोडलेल्या झाडांची विक्री केल्यास वादीचे कशानेही भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होईल असे मला वाटते. याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी क्र. १ याचे कोणतेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. परिणामी मुद्दे क्र. २ व ३ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवत आहे.

## <u>मुद्दा क्र. ४ करीता</u>

३३. मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परिणामी या मुद्दयाच्या निष्कर्षार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे :

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ याने दाव्याच्या अंतिम निकालापावेतो दावा मिळकतीमधील तोडलेली झाडे उचलू नयेत, वाहतूक करु नये अगर त्याची विक्री करु नये अगर दावा मिळकतीमधील इतर कोणतीही झाडे तोडू नयेत, दावा मिळकती हस्तांतरीत करु नयेत अगर दावा मिळकतीमध्ये ति—हाईत इसमांचा हक्क प्रस्थापित करु नये असा तुर्तातुर्त मनाईचा आदेश पारित करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

देवगड ( गि.सु.माने )
दिनांक ०१/०३/२०१७ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.